मंगळवार, ३१ डिसेंबर २०१३
पुणे टाइम्स



# पर्यावरणावर व्यक्त व्हा...

पुणे टाइम्स टीम

शॉर्टफिल्म आणि फोटोग्राफीच्या माध्यमातून पर्यावरणाशी संबंधित संदेश पोहोचवण्यासाठी काम करणाऱ्यांना 'वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा'च्या निमित्तानं व्यासपीठ मिळणार आहे. यंदा हा महोत्सव १७ जानेवारीपासून सुरू होत असून, त्यासाठी फिल्म आणि फोटो पाठवण्याची अंतिम तारीख ३ जानेवारी आहे.

यंदाचं महोत्सवाचं आठवं वर्ष आहे. पुण्याबाहेरूनही या महोत्सवाला प्रतिसाद मिळत आलाय. म्हणून तो सहा राज्यांतील २८ शहरांत होणार आहे. किर्लोस्कर आणि वसुंधरा क्लबच्या वतीनं या महोत्सवाचं आयोजन करण्यात येतं. फिल्मसाठी पर्यावरण हा विषय देण्यात आला आहे. त्याला भाषेचं कोणतंही बंधन नसलं, तरी फिल्म ३० मिनिटांपेक्षा जास्त नसावी. 'पर्यावरण माझ्या नजरेतून' आणि 'आशेचा किरण' या दोन विषयांवर महोत्सवासाठी छायाचित्रं मागवण्यात आली आहेत. निवडक १५० छायाचित्रांचं फिरतं प्रदर्शन विविध शहरांत मांडण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी आणि नावनोंदणीसाठी संपर्क : फिल्मसाठी : सुप्रिया चित्राव : ९८८११२०६२०. छायाचित्रांसाठी : लता धैसास : ९८५०२०१२६०.